महाराष्ट्र पोलीस

पोलीस उप आयुक्त वाहतुक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ११८ /२०२२ दि. १५/१२/२०२२

**"वाहतूक नियंत्रण अधिसुचना"**

**ज्याअर्थी,** ठाणे शहरातील राबोडी वाहतूक उपविभागाचे हद्दीत दि. १७/१२/२०२२ रोजी मिनाताई ठाकरे चौक उड्डाणपुलाच्या खाली हॉलीक्रॉस के. व्हिला, ठाणे येथील जुन्या नाल्यावरील पूल पाडून नवीन पुलाचे काम करण्यात येणार आहे. त्याकरीता सदर रस्त्यावरील वाहतूक वळविण्यात येणार असल्याने सदर परिसरात वाहतुकीची कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी डॉ. विनयकुमार राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे.

| | |
|---|---|
| **प्रवेश बंद –** | १) जी पी. ओ. कडून के. व्हिला मार्गे मिनाताई ठाकरे चौक कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना जी पी. ओ. येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदरची वाहने जी पी. ओ., सिव्हील हॉस्पिटल कॉर्नर, उथळसर नाका मार्गे मिनाताई ठाकरे चौक मार्गे इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | २) मिनाताई ठाकरे चौक कडून के. व्हिला मार्गे जी पी. ओ. कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना मिनाताई ठाकरे चौक येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदरची वाहने मिनाताई ठाकरे चौक, उथळसर नाका, सिव्हील हॉस्पिटल कॉर्नर मार्गे इच्छित स्थळी जातील. |

सदरची वाहतूक अधिसूचना ही दि. १७/१२/२०२२ रोजी सकाळी १०.०० वा. पासून सदर काम पूर्ण होईपर्यंत अंमलात राहील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसूचना ही पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१/वि.शा. ठाणे

CamScanner

**प्रत कार्यवाहीसाठी :–**
प्रादेशिक परिवहन अधिकारी ठाणे
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे,
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे,
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे.

**प्रत :–** पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत :–** समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत :–** सपोआ वाहतूक विभाग, ठाणे व पो.निरी. नौपाडा, ठाणेनगर, कळवा, राबोडी, वाहतूक उपविभाग ठाणे.

CamScanner